# अवयवदान: आयुष्याची भेट

वैद्यकिय क्षेत्रात माणसाने केलेली प्रगती अचंबित करणारी आहे. नव-नवीन उपचारपध्दती, औषधे ह्या विषयातील संशोधन अजूनही सुरूच आहे. ह्याचीच परिणीती म्हणजे, आज आपण, असाध्य मानल्या गेलेल्या कॅन्सरसारख्या आजारांवरही लिलया मात करू शकतो. नवीन तंत्रज्ञानामूळे हृदय शस्त्रक्रिया सहज- सुलभ झाल्या आहेत. निकामी झालेल्या अवयवांचे आणि पेशींचे प्रत्यारोपण करण्याचे तंत्र उत्तम विकसीत झाले आहे. त्यामूळे किडनी, लिव्हर, फुफ्फुसे, हृदय, डोळे, बोन-मॅरो, त्वचा वगैरे अवयव आणि पेशींचे प्रत्यारोपण शक्य झाले आहे.

हे खरे असले, तरी आजही आपल्याला स्वत:चे रक्त किंवा कृत्रीम अवयव बनवण्यात यश आलेले नाही, हेही सत्यच आहे. त्यामूळे, जेंव्हा प्रत्यारोपणासाठी अवयव किंवा पेशींची आवश्यकता भासते, तेंव्हा ते अवयव आणि पेशी ह्या माणसाच्याच असाव्या लागतात. त्यामुळे, गरजवंत रुंग्णानां योग्य वेळी आवश्यक अवयव मिळावेत, ह्यासाठी मरणोत्तर अवयवदान हा एकमेव पर्याय आहे.

मरणोत्तर अवयवदान केल्यास एक व्यक्ती १६ व्यक्तींचे प्राण वाचवू शकते. मृत व्यक्तीचे हृदय, किडनी, लिव्हर, फुफ्फुसे, पॅंक्रीयाज्, इंटेस्टाइन हे अवयव आणि कॉर्नीया, बोन-मॅरो, त्वचा, हृदयाच्या झडपा, नर्व्हज् (नसा), रक्तवाहिन्या वगैरे पेशी यांचा उपयोग इतरांचे प्राण वाचवण्यासाठी करता येऊ शकतो.

पण जनजागृतीचा अभाव, अपुरी माहिती, गैरसमज, भिती ह्यामूळे आपल्या देशात मरणोत्तर अवयवदानाचे प्रमाण अत्यल्प आहे. भारतात दर दहा लाख मृतांमागे फक्त ०.१६ व्यक्ती मरणोत्तर अवयवदान करतात. हेच प्रमाण स्पेनमध्ये १० लाख मृतांमागे ३५.१ व्यक्ती असे आहे. अवयवदानात भारताचा क्रमांक शेवटचा लागतो.

भारतात प्रत्येक राज्यात, अवयवदानासंबंधीचे नियम आणि मार्गदर्शक तत्व भिन्न आहेत. त्यामुळे प्रत्येक राज्यातील अवयवदानाची स्थिती वेग-वेगळी आहे. तामिळनाडू राज्यात गेल्या ३ वर्षात, ६०० व्यक्तींनी मरणोत्तर अवयवदान केले आहे. पण हेच प्रमाण राजस्थान आणि बिहारमध्ये शुन्य आहे. मुंबईत गेल्या वर्षी अंदाजे १०० व्यक्तींनी अवयवदान केले आहे.

माणसाला जन्मत:च दोन किडनी असल्यामूळे, एक किडनी जीवंतपणीदेखील दान करता येऊ शकते. पण इतर अवयव आणि पेशी, मृत्यूनंतरच दान करता येतात. तसेच किडनी विकारांत, डायलिसिसचा पर्याय उपलब्ध आहे. परंतू डायलिसिस करणाऱ्या व्यक्तीचे सरासरी आयुष्यमान ७ वर्षे तर किडनी प्रत्यारोपण झालेल्या व्यक्तीचे सरासरी आयुष्यमान २२ वर्षे असते.

भारतात दरवर्षी अंदाजे ४००,००० व्यक्ती किडनी विकारांचे शिकार होतात. पण फक्त १०,००० (अंदाजे २%) रुंग्णांना डायलिसीसचा उपचार मिळू शकतो. तर फक्त ५,००० भाग्यवंतांना म्हणजे १% रुंग्णांना किडनी प्रत्यारोपणाची संधी मिळते. उरलेल्या ९७% रुंग्णांचे काय होत असेल ही गोष्ट विचार करायला लावण्यासारखी आहे.

मधुमेहाचे (डायबेटीस) जगातील सर्वाधिक रुग्ण आपल्या भारतात आहेत. मधुमेह असलेल्या ३५% ते ४०% व्यक्तींना किडनी विकार होण्याची शक्यता असते. तसेच, बदललेले रहाणीमान आणि खाण्या-पिण्याच्या सवयी यामुळे, उच्चरक्तदाब व ओबेसीटी (स्थुलपणा) असलेल्या रुंग्णांचे प्रमाणही वाढत आहे. अशा ५ रूग्णांपैकी १ रुंग्ण किडनी विकारांचा बळी ठरु शकतो. ही सद्यस्थिती, किडनीदानाचे, पर्यायाने अवयवदानाचे महत्व पटवण्यास पुरेशी बोलकी असावी.

आपल्या देशात दररोज ६०० व्यक्ती अपघातात मृत्यूमूखी पडतात. त्यातील १०% ह्या मेंदू-मृत (ब्रेनडेड) असतात. त्यांचे अवयव गरजू रुंग्णांसाठी उपलब्ध झाल्यास, अनेक रुंग्णांचे प्राण वाचू शकतात. परंतू सरकारी नियम आणि कायद्याच्या अडथळ्यांमूळे हे शक्य होऊ शकत नाही.

ह्या सर्वातून मार्ग काढण्यासाठी, जनमानसातील गैरसमज व भिती दूर करुन त्यांना अवयवदानासाठी प्रवृत्त करणे गरजेचे आहे. नर्मदा किडनी फाउंडेशन, तसेच अनेक इतर स्वयंसेवी संस्था ह्यासाठी कार्यरत अहेत. पण अवयवांची मोठ्याप्रमाणांतील आवश्यकता लक्षात घेता, बरेच काही करण्याची गरज आहे. थोडक्यात मोठ्याप्रमाणात अवयवदात्यांची गरज आहे.

तेंव्हा, मृत्यूनंतर अवयव स्वर्गात घेऊन जाण्याऐवजी, मरणोत्तर अवयवदान करुन, गरजवंतांना आयुष्याची भेट देउया!

- डॉ. प्रशांत राजपूत. (किडणी विकार तज्ञ)